ePaper
अमित शहांनी शब्द पाळला नाही; उद्धव ठाकरे यांचा पुनरुच्चार

वर्ष - 7 I अंक -71 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www .mahaenews.com | मंगळवार, दिनांक 11 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत

- जातीयवादी नीलमताई..!
- पुण्यात पोलिसांचा वचक बसण्यासाठी काढली गुंडांची धिंड!
- 'सीएमई' हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला

### बंडखोर आमदार अण्णा बनसोडेंचे स्पष्टीकरण; सत्तेत सहभागी

# दादांना सीएम करण्यासाठीच!

**» अजितदादांसारख्या कार्यक्षम नेत्याने मुख्यमंत्री व्हावे, ही महाराष्ट्रातील तमाम जनतेची इच्छा**

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर आमचा विश्वास आहे. त्यांना मुख्यमंत्री करण्यासाठीच आम्ही सत्तेत सहभागी झालो असल्याचे पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी सोमवारी येथे स्पष्ट केले. बनसाडे हे अजितदादांचे समर्थक म्हणून ओळखले जातात. पहाटेच्या शपथविधीच्या वेळीही त्यांनी दादांना साथ देणे पसंत केले होते. आता दादांच्या बंडातही ते त्यांच्यामागे ठामपणे उभे राहिले असल्याचे दिसत आहे. पिंपरीत पत्रकारांनी त्यांच्याशी संवाद साधला. त्या वेळी बोलताना ते म्हणाले, मी अजितदादांचा कट्टर कार्यकर्ता आहे. त्यांच्यासोबत मी 25 वर्षांपासून काम करीत आहेत. त्यांच्या नेतृत्वावर आपला पूर्णपणे विश्वास आहे. मुख्य म्हणजे अजितदादांसारख्या कार्यक्षम नेत्याने मुख्यमंत्री व्हावे, ही महाराष्ट्रातील तमाम जनतेची इच्छा आहे. आम्हा सर्वांचीही तीच इच्छा आहे. त्यामुळेच सत्तेत सहभागी होण्याची भूमिका आम्ही दादा समर्थक आमदारांनी घेतली आहे.**




सत्तेत सहभागी झाल्याने राज्याच्या, शहराच्या विकासाला चालना मिळू शकते. आज युवक, महिला, ज्येष्ठ नागरिकांसह सर्वसामान्यांपुढे मोठे प्रश्न आहेत. हे प्रश्न सुटले पाहिजेत. लोकांना न्याय मिळाला पाहिजे. त्याकरिता सत्तेत जाण्याचा निर्णय दादांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीने घेतला आहे. विधानसभा निवडणुकीला अद्याप एक ते दीड वर्षे बाकी आहे. उर्वरित कामे पूर्ण केली, तर निवडणुकीत त्याचा पक्षाला फायदा होऊ शकेल.

राष्ट्रवादीचे अधिकाधिक आमदार निवडून येतील. आमचे अधिक आमदार निवडून आले, तर स्वाभाविकपणे आम्हाला मुख्यमंत्रिपदावर दावा करता येईल व अजितदादा मुख्यमंत्री होतील. सध्या अजितदादा उपमुख्यमंत्री असले, तरी ते नक्कीच आगामी काळात मुख्यमंत्री होणार, असा विश्वासही बनसोडे यांनी या वेळी व्यक्त केला.

## महापालिका निवडणुकीत जागा वाटपाचा तिढा

**» भाजपा, शिंदे , पवार गटाची डोकेदुखी**
**» तीनही पक्षाच्या इच्छुकांमध्ये धाकधूक**

राज्यातील समीकरणे बदलताच राज्य निवडणूक आयोगाने महापालिकेची निवडणूक सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये घेण्याचे संकेत दिल्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीतील आखाडे बांधण्यास सुरुवात झाली आहे. भाजप-शिंदे गट-अजित पवार गटातील पक्षाच्या इच्छुकांमध्ये जागांवरून धाकधूक वाढली आहे. तीनही पक्ष जागा वाटपाचा तिढा कसा सोडविणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. दरम्यान, भाजपने आमचाच महापौर येईल असा विश्वास व्यक्त केला आहे. दिवंगत लक्ष्मण जगताप, आमदार महेश लांडगे यांनी २०१७ मध्ये अजित पवार यांचा बालेकिल्ला उद्धवस्त केला. पालिकेवर भाजपची एकहाती सत्ता आणली. शहरात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोनच पक्ष प्रबळ असून एकमेकांचे विरोधक आहेत. २०१७ मध्ये या दोन पक्षांनी १२८ जागांवर निवडणूक लढविली होती. भाजपचे ७७, राष्ट्रवादीचे ३६, शिवसेना नऊ, अपक्ष पाच आणि मनसे एक असे संख्याबळ होते. आता राज्यातील समीकरणे बदलली आहेत. अजित पवार हे शिंदे-फडणवीस यांच्या सरकारमध्ये सहभागी झाले आहेत.



### मैत्रीपूर्ण लढत शक्य आहे का

**» अजित पवार यांनी बंडखोरी करताना महापालिका निवडणुकांबाबत स्थानिक पातळीवर निर्णय होईल असे स्पष्ट केले होते. पालिकेवर मागील पाच वर्षे भाजपने एकहाती राज्य केले. अजित पवार यांच्या गटालाही एकहाती सत्ता हवी आहे. शिंदे गटाची शहरात तेवढी ताकद नाही. भाजप-अजित पवार गट एकत्रित लढल्यास बंडखोरी अटळ राहील. त्यामुळे स्वबळावर मैत्रीपूर्ण लढती होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. निवडणुकीनंतर हे तीनही पक्ष एकत्रित येवू शकतात.**

### काँग्रेस-ठाकरे-पवार गट एकत्रित

**» महाविकास आघाडी म्हणून काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस निवडणुका एकत्रित लढू शकतात. शहरातील राष्ट्रवादी अजित पवार यांच्या गटात गेली असली. तरी, शहरातील जुने कार्यकर्ते शरद पवार यांच्यासोबत आहेत. जुने शिवसैनिकही ठाकरेंबरोबरच दिसतात. काँग्रेसचीही ताकद आहे. सत्तेतील भाजप-अजित पवार गट-शिंदे गटाच्या विरोधात महाविकास आघाडी एकत्रित निवडणूक लढेल असे चित्र दिसत आहे.**

### वरिष्ठ पातळीवरील निर्णय मान्य - गव्हाणे

**» राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) शहराध्यक्ष अजित गव्हाणे म्हणाले, राज्यातील नवीन समीकरणामुळे वरिष्ठ पातळीवर जो निर्णय होईल. त्याची अंमलबजावणी केली जाईल. पक्षाने निवडणुकीची पूर्ण तयारी केली आहे. निवडणूक कधीही जाहीर झाल्यास आम्ही निवडणुकीला सामोरे जाण्यास तयार आहोत.**

## जनसंवाद सभेमध्ये सुचना केलेली कामे पुर्ण केल्याबद्दल ना नागरिकांकडून

# क्षेत्रीय अधिकाऱ्यांचा सत्कार!

### » जनसंवाद सभेत एकूण 43 तक्रारवजा सूचनांची नोंद

।पिंपरी ।महाईन्यूज। प्रतिनिधी।



**मागील जनसंवाद सभेमध्ये सुचना केलेली कामे पुर्ण केल्याबद्दल नागरिकांकडून क्षेत्रीय अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. ह क्षेत्रीय कार्यालयात आज झालेल्या जनसंवाद सभेत क्षेत्रीय अधिकारी उमेश ढाकणे यांच्यासह स्थापत्य, विद्युत आणि पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.**

नागरिकांना महापालिकेच्या संबंधित असलेल्या तक्रारी अडचणी लवकरात लवकर सोडविण्याच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन सर्व क्षेत्रिय कार्यालयांमध्ये करण्यात येते.

महापालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयांमध्ये आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत एकूण ४३ तक्रारवजा सूचनांची नोंद झाली. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अनुक्रमे ११, ४, २, ५, २, ४, ८ आणि ७ तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या. अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, सहशहर अभियंता श्रीकांत सवणे, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, अजय चारठाणकर यांनी भूषवले. तसेच यावेळी क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, आण्णा बोदडे, किरण मोरे, राजेश आगळे, सिताराम बहुरे, शितल वाकडे, उमेश ढाकणे उपस्थित होते.

**यासाठी क्षेत्रिय कार्यालयनिहाय जनसंवाद सभा**

**»जनसंवाद सभा ही नागरिक आणि महापालिका यांच्यातील समन्वयक ठरत असून विविध प्रश्न, सूचना, तक्रारींच्या माध्यमातून महापालिकेची ध्येय धोरणे, निर्णयांमध्ये नागरी सहभाग वाढविण्यासाठी देखील महत्वाची भूमिका बजावत आहे. जनसंवाद सभेकरिता महानगरपालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांसाठी क्षेत्रीय कार्यालय निहाय मुख्य समन्वय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या गेल्या आहेत. शहरात होणाऱ्या विकासकामांमध्ये नागरिकांच्या आशा आकांक्षांचे प्रतिबिंब उमटावे यासाठी क्षेत्रिय कार्यालयनिहाय जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येत असते.**

आज संपन्न झालेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी आणि सूचना मांडल्या. यामध्ये शहरात डासांची संख्या वाढल्यामुळे प्रतिबंधात्मक फवारणी करण्यात यावी, उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अनाधिकृत फ्लेक्सवर कारवाई करण्यात यावी, बसथांब्यांचे नुतनीकरण करण्यात यावे, ओपन जिमच्या साहित्यांची दुरूस्ती करण्यात यावी, पदचारी मार्गावर होणारे अतिक्रमण हटवावे, शहरात वाढणाऱ्या रहदारीचे योग्य नियोजन करावे, खराब झालेल्या ड्रेनेज लाईन दुरूस्त करण्यात याव्यात, पाणीपुरवठा योग्य दाबाने

---

# आम आदमी पक्षाच्या युवक प्रदेशाध्यक्ष पदी मयूर दौंडकर यांची नियुक्ती

### » सामान्य कुटुंबातून आलेल्या युवकाला 'आप'कडून मोठी जबाबदारी

। पिंपरी चिंचवड। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**लोकचळवळीतून निर्माण झालेल्या आम आदमी पक्षाची यशस्वी राजकीय वाटचाल देशभरात होत आहे. पक्षाचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री मा. श्री अरविंदजी केजरीवाल यांच्या विकासात्मक दृष्टीमुळे पंजाबमध्ये देखील पक्षाला मोठे यश मिळाले. देशभरात आज जातीय आणि सामाजिक ध्रुवीकरणाचे राजकारण सुरु असताना सामान्य जनतेसह युवकांना आम आदमी पक्ष आशेचा किरण दिसत आहे. त्यामुळे पक्षाकडून देखील विस्तार केला जात असून महाराष्ट्रामध्ये नव्याने पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील सामान्य कुटुंबातील असणारे श्री. मयूर दौंडकर यांची राज्य युवा आघाडीच्या अध्यक्षपदी पक्षाकडून नियुक्ती करण्यात आली आहे.**




**"माझ्या सारख्या सामान्य कुटुंबातील युवकाला राज्य पातळीवर संघटन बांधणीसाठी जबाबदारी दिल्याबद्दल आम आदमी पक्षाचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री मा. श्री अरविंद केजरीवालजी, राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी श्री. डॉ संदीप पाठकजी, महाराष्ट्र प्रभारी श्री. दीपक सिंघलाजी, राज्याचे सह प्रभारी श्री. गोपाल इटालियाजी यांचा मी आभारी आहे. येणाऱ्या काळामध्ये महाराष्ट्रातील घराघरामध्ये पक्षाचे विचार पोहचवण्यासाठी तसेच युवकांना संघटीत करण्यासाठी मी मेहनत घेण्याचा विश्वास व्यक्त करतो.**

**– मयूर दौंडकर,** युवक प्रदेशाध्यक्ष आम आदमी पक्ष

आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी श्री. डॉ संदीप पाठक, महाराष्ट्र प्रभारी श्री. दीपक सिंघला, राज्याचे सह प्रभारी श्री. गोपाल इटालीय यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे मयूर दौंडकर यांची राज्य युवा आघाडीच्या अध्यक्षपदी नेमणूक केल्याची घोषणा केली आहे. दौंडकर हे सध्या खेड -आळंदी विधानसभा युवक अध्यक्ष म्हणून कार्य करत होते. या काळामध्ये त्यांनी तालुक्यासह पुणे जिल्ह्यामध्ये युवकांचे संघटन करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले आहेत. युवा संवाद सारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी युवकांना राजकीय व्यासपीठ मिळवून देण्यासाठी काम केलं.

जनावरांमध्ये आलेल्या लंपी आजारामध्ये गावातल्या साडेचारशे जनावरांना मोफत लसी देणे, कोरोना काळामध्ये पक्षातर्फे रक्त, प्लाझ्मा मिळवून देण्यापासून ते अगदी रूग्णांना डबे पोहोचवण्यापर्यंतचे सामाजिक काम मयूर दौंडकर यांच्याकडून करण्यात आले.

आम आदमी पक्षाच्या राज्य युवा आघाडीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर मयूर दौंडकर म्हणाले, "शाळा तसेच महाविद्यालयीन जीवनापासून श्री. अरविंदजी केजरीवाल यांचे विचार, त्यांच्या कामाच्या पद्धतीमुळे मी प्रभावित झालो.

आपल्या लोकांच्या आणि समाजाच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून कोणताच देश विकास करू शकणार नाही. आज देशात आणि राज्यामध्ये अनिश्चिततेच राजकारण सुरु असल्याने युवकांमध्ये प्रचंड संतापाची लाट आहे. या युवकांनी आता पुढे येऊन राजकरणात सक्रीय होणे गरजेचे आहे. येत्या काळामध्ये पक्षाने दिलेल्या संधीच्या माध्यमातून राज्यभरातील युवकांना 'आप'मध्ये सक्रीय करण्यासाठी काम करणार आहे."

# भोसरीत आमदार महेश लांडगे यांची ‘आखाड पार्टी’ जोरात!

## 1 लाख 37 हजाराहून अधिक सर्वसामान्य नागरिकांनी घेतला आस्वाद

### सुमारे 4 टन मटन अन् 2 टन चिकन; शाकाहारींसाठी स्वतंत्र व्यवस्था

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील गोरगरीब नागरिकांनाही ‘आखाड पार्टी’ साजरी करता यावी. आपल्या मित्र परिवारासह कार्यकर्त्यांना वर्षातून एकवेळ सामिष्ट पाहुणचार द्यावे. याकरिता आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या आखाड पार्टीत तब्बल ४ टन मटन, २ टन चिकन फस्त करण्यात आले. विशेष म्हणजे, ‘कम्युनिटी किचन’च्या धर्तीवर भोसरी विधानसभा मतदार संघात एकूण १३ ठिकाणी भोजन व्यवस्था करण्यात आली. त्यामध्ये सुमारे १ लाख ३७ हजार गोरगरिब नागरिक आणि पिंपरी-चिंचवडकरांनी आखाड भोजनाचा आस्वाद घेतला. त्यामुळे आमदार लांडगे यांची ‘आखाड पार्टी’ महाराष्ट्रातील ‘रेकॉर्ड ब्रेक’ ठरली आहे**

पिंपरी-चिंचवडमध्ये देशातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत पार पडली होती. यामुळे याकडे देशाभरातील शेतकऱ्यांचे लक्ष वेधले होते. महाराष्ट्रात आखाड महिन्यात आप्तेष्टांना सामिष्ट भोजनासाठी निमंत्रित करण्याची प्रथा आहे. मांसाहारी नागरिकांमध्ये आखाडाची विशेष रुची असते. त्यामुळे कोणताही कार्यक्रम ‘ग्रँड सेलिब्रेशन’ करण्याची हातोटी असलेल्या आमदार लांडगे यांच्या समर्थकांनी संपूर्ण भोसरी विधानसभा मतदार संघात यावर्षीचा आखाड एकत्रितपणे आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सोबतीने उत्साहात साजरा केला. तसेच, कोणतेही मध्यपान किंवा गैरप्रकार होणार नाही. याची आयोजकांनी पूर्ण काळजी घेतली.



### एकाच वेळी 13 ठिकाणी मेजवाणी...

एकाच दिवशी एका वेळी १३ ठिकाणी दिलेली ही सर्वात मोठी ‘मेगा आषाढ मेजवानी’ ठरली आहे. आमदार लांडगे समर्थक माजी नगरसेवक व पदाधिकाऱ्यांकडे आखाड पार्टीच्या नियोजनाची जबाबदारी होती. भोसरीतील संत तुकाराम मंगल कार्यालय, प्रभू रामचंद्र सभागृह, गव्हाणेवस्ती, पर्ल बँक्वेट, इंद्रायणीनगर, ओंकार लॉन्स, सिव्हर गार्डेनिया, बोऱ्हाडेवाडी, मोशी, जय गणेश लॉन्स शेजारी, मोशी, गंधर्वनगरी फेज-२, मोशी, चंद्रभागा गार्डन, जाधववाडी, खंडू सगळे गोडाऊन, रुपीनगरी, तळवडे, निलेश भालेकर जनसंपर्क कार्यालय, त्रिवेणीनगर, पेरुमल पिल्ले हॉल, रसरंग चौक, अजमेरा, बापु घोलप फार्म हाऊस, सहयोगनगर, निगडी अशा ठिकाणी सामूदायिक भोजन व्यवस्था करण्यात आली होती.



“ श्रावण हा सण-उत्सावाचा पवित्र महिना म्हणून ओळखला जातो. या काळात महिना-दीड महिना वातावरणातील बदल आणि हिंदू धर्माप्रमाणे मांसाहार वर्ज आहे. त्याआधी आषाढ महिन्यात मांसाहार करण्याची एक परंपरा आहे. त्यामुळे सर्वच ठिकाणी आखाड साजरा केला जातो. मतदार संघातील गोरगरिब, कष्टकरी, चाकरमानी यांच्यासोबत एकत्रितपणे आखाड पार्टी करण्यासाठी आम्ही १५ वर्षांपासून सुरूवात केली. त्याला आता भव्य स्वरुप प्राप्त झाले आहे. आपुलकीने नागरिक या सामिष्ट स्नेहभोजनासाठी सहभागी होतात. याचे समाधान वाटते.

**- महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# मोशीतील आंतरराष्ट्रीय सफारी पार्कच्या कामाला ‘चालना’

## भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांची सूचना

### महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पर्यटनाच्या क्षेत्रात पिंपरी-चिंचवड शहराचे नाव जगाच्या नकाशावर यावे. या करिता महापालिका प्रशासनाच्या वतीने मोशी येथील आरक्षित जागेवर “आंतरराष्ट्रीय दर्जाचे सफारी पार्क” विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या कामाला चालना द्यावी, अशी सूचना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली केली आहे.**




याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, मोशी येथील आरक्षित जागी सेन्टॉस्सा पार्क, सिंगापूरच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय दर्जाचा ‘सफारी पार्क’ साकारण्याचे काम प्रस्तावित आहे. त्यासाठी सल्लागार कंपनीची नियुक्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून प्रकल्पाच्या कामाला गती द्यावी. पिंपरी-चिंचवड महापालिकेकडील मंजूर विकास आराखड्यातील मोशी येथील गट नंबर ६४६ सरकारी गायरान जमिनीवर ३३.७२ हेक्टरचे क्षेत्र सफारी पार्क म्हणून आरक्षित (आरक्षण क्रमांक १/२०७) आहे. सफारी पार्कची आरक्षित जागा पुणे, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महापालिकेकडे हस्तांतरित केली आहे. मोशीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे ‘सफारी पार्क’ विकसित होणार असल्याने समाविष्ट गावाच्या विकासांना आणखीन चालना मिळणार आहे.

त्यामुळे सफारी पार्कचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करावे, अशी सूचना आहे. पर्यटन क्षेत्राच्या आंतरराष्ट्रीय नकाशावर पिंपरी-चिंचवडचे नाव उमटण्यासाठी हा प्रकल्प अत्यावश्यक आहे. त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणारी सल्लागार कंपनी नियुक्त करावी, अशी सूचना आमदार लांडगे यांनी केली आहे.

“ मोशी परिसरात पिंपरी-चिंचवडमधील कचरा डेपो आहे. संपूर्ण शहरातील कचऱ्याचा भार मोशी आणि परिसरातील नागरिक सहन करीत आहेत. आगामी काळात मोशीची ओळख ‘ मोशी कचरा डेपो’ अशी न राहता मोशीतील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सफारी पार्क म्हणून निर्माण व्हावी, अशी आमची भावना आहे. त्यादृष्टीने प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी सूचना प्रशासनाला केली आहे.

**- महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**




# जनगणनेला विलंब का ?

**लोकसंख्यावाढीमुळे गरिबी, बेरोजगारी, रोगराई आदी समस्यांकडे जगाचे लक्ष वेधून त्याविषयी जनजागृती करण्यासाठी सन १९८९ पासून ११ जुलै हा दिवस 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. लोकसंख्येची संख्या आणि स्वरूप सांगणारी जनगणना हा कोणत्याही देशाच्या विकासातील मैलाचा दगड असतो. देशाच्या धोरणनिर्मितीमध्ये जनगणना महत्त्वाची भूमिका बजावते.**

काही दिवसांपासून संयुक्त राष्ट्रांचा 'यूएनएफपीए' हा लोकसंख्याविषयक अहवाल, काही संकेतस्थळे, काही वृत्तसंस्था भारताची लोकसंख्याविषयक आकडेवारी प्रसिद्ध करत आहेत. यात भारताने लोकसंख्येच्या बाबतीत चीनला मागे टाकल्याचे सांगितले जात आहे. पण अधिकृत जनगणना केल्याशिवाय भारताच्या लोकसंख्येविषयी नेमकी व अचूक आकडेवारी शोधणे फार कठीण आहे. अधिकृत जनगणनेमुळे भारतातील राज्यनिहाय लोकसंख्या, साक्षरता, लिंग गुणोत्तर, लोकसंख्येची घनता, शहरी व ग्रामीण लोकसंख्या, वयोगटानुसार लोकसंख्या, धर्म, जाती – जमाती व भाषानिहाय लोकसंख्या इत्यादी अनेक बाबींचे अचूक विवरण व विश्लेषण करता येते. जनगणना ही देशातील सर्व व्यक्तींशी संबंधित लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक माहितीचे (डेटा) संकलन, विश्लेषण व प्रसारण करण्याची प्रक्रिया आहे. पारतंत्र्यकाळात सन १८७१ पासून भारतात दर दहा वर्षांनी जनगणना होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५१ साली नववी जनगणना झाली. याआधीची भारतीय जनगणना २०११ मध्ये झाली होती. या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १२१



कोटी म्हणजे १.२१ अब्ज होती. २०२१ मध्ये पुढील जनगणना होणे अपेक्षित होते. परंतु कोव्हिड- १९ साथरोगामुळे ती होऊ शकली नाही. आता तर जनगणनेस दोन वर्षे विलंब झाला आहे.

भारतात शेवटची जनगणना झाली होती २०११ साली. म्हणजे साधारण १२ वर्षांपूर्वी. सरकार सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे पात्र लोकांना रेशन पुरवते पण देशात किती अन्नधान्याची गरज आहे, याचा अंदाज आजही २०११ सालच्या आकडेवारीवरून घेतला जात आहे. याशिवाय शैक्षणिक आणि आरोग्य व्यवस्था, पायाभूत सोयीसुविधा उभारण्यासाठीही किती निधी कुठे दिला जावा, याचा अभ्यास आपल्याला वेळोवेळी करणे गरजेचे आहे. अन्यथा आवश्यक साधनसामग्रीचा पुरवठा अपुरा किंवा असंतुलित होऊ शकतो. आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे सरकारच्या कल्याणकारी योजना ठरवतानाही या आकडेवारीचाच आधार घ्यावा लागतो. काही अर्थतज्ज्ञांच्या मते जनगणना न झाल्यामुळे जवळजवळ १० कोटी लोक सरकारी योजनांपासून वंचित राहत आहेत.

खरेतर २०२१ च्या जनगणनेचा पहिला टप्पा २०२० साली सुरू होणार होता, पण तेवढ्यात करोना आला आणि सगळेच थांबले. मात्र करोनाच्या आधीही जनगणना वादाचा मुद्दा बनलाच होता. २०१९ मध्ये सरकारने आणलेला नागरिकत्व दुरुस्ती कायदा, त्यानंतर 'नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर' अर्थात 'एनपीआर'चा वाद, यामुळे देशात आंदोलने झाली, अशांतता पसरली. त्यानंतर काही राजकीय नेत्यांनी जातीनिहाय जनगणनेची मागणी केली . यातून सामाजिक रचना कळेल, असे त्यांना वाटत होते. पण यामुळे राजकीय मतपेढी आणि मतांचे राजकारणही बदलू शकते, अशी भीती काही राजकीय पक्षांना वाटू लागली आहे. 'इम्पीरिकल डेटा' नसल्यामुळे मराठा आरक्षण तसेच ओबीसींसाठी राजकीय आरक्षणाचा मुद्दा गेली दोन वर्षे न्यायालयात प्रलंबित आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्यासाठी ओबीसी आरक्षणाचे कारण सांगितले जाते आहे. ओबीसी आरक्षणाच्या विषयात इम्पेरिकल डेटाच्या माध्यमातून माहिती गोळा करणे अवघड आहे.

त्यामुळे ओबीसी समाजाच्या आर्थिक स्थितीचा डेटा मिळवण्यासाठी सर्वोत्तम स्त्रोत हा जनगणनेची माहितीच ठरू शकते! त्यामुळे येत्या काळात जातीनिहाय जनगणनेची मागणी जोर धरू शकते एवढे मात्र नक्की! जनगणनेच्या आधी सर्व राज्यांना त्यांच्याकडे किती जिल्हे, तालुका आणि गावे आहेत, याची माहिती 'रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया'ला द्यावी लागते. त्यानंतर जनगणना सुरू होण्याच्या तीन महिन्यांपूर्वी प्रशासकीय सीमा गोठवल्या जातात, जेणेकरून जनगणना सुरू असताना कुठल्याही सीमा बदलल्या जाऊ नयेत आणि किती लोक कुठे राहतात, हे कळेल. पण रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडियाने सीमा गोठवण्याची मुदत गेल्या दोन वर्षांत सातत्याने वाढवली आहे. त्यामुळे काहींना असंही वाटतं की २०२४ च्या उत्तरार्धात म्हणजे लोकसभा निवडणुकीनंतरच जनगणना होईल! जनगणना हा विषय संविधानाच्या सातव्या सुचीनुसार केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अखत्यारित येतो. या मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या रजिस्ट्रार जनरल व जनगणना आयुक्त कार्यालयातर्फे जनगणना केली जाते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ऑनलाईन (डिजीटल) जनगणना करण्याचे सूतोवाच केले आहे. त्यांच्या मते ही ई – जनगणना अधिक शास्त्रशुद्ध व अचूक असेल! या ई- जनगणनेमुळे नाव-पत्ता बदलणे, जन्म-मृत्यू यांच्या नोंदी करणे सोपे होईल. त्यामुळे भारताची जनगणना सातत्याने अद्ययावत राहील.

## संपादकीय »

### जंगल में (अ)मंगल?

***पर्यावरण रक्षण, कर्ब उत्सर्जन नियंत्रण आदी शब्दप्रयोग अलीकडे फारच सातत्याने केले जातात. या शब्दवापरांतून पर्यावरण रक्षणार्थ बांधिलकी मिरवण्याचा संबंधितांचा प्रयत्न असतो.***

पर्यावरण रक्षण, कर्ब उत्सर्जन नियंत्रण आदी शब्दप्रयोग अलीकडे फारच सातत्याने केले जातात. या शब्दवापरांतून पर्यावरण रक्षणार्थ बांधिलकी मिरवण्याचा संबंधितांचा प्रयत्न असतो. तथापि वास्तव तसे असते काय? उदाहरणार्थ भारतातील जंगल संवर्धन.

आपल्या देशाचे एकूण भौगोलिक क्षेत्र लक्षात घेतले तर पर्यावरण संतुलनासाठी ३३ टक्के जंगल आवश्यक. काँग्रेसच्या राजवटीत तयार करण्यात आलेल्या या कायद्यात प्रस्तावित सुधारणा संयुक्त संसदीय समितीने जशाच्या तशा मान्य केल्याचे वृत्त 'द हिंदू'ने दिले असून त्यामुळे आता हे सुधारणा विधेयक येत्या २० जुलैपासून सुरू होणाऱ्या संसद अधिवेशनात बहुमताच्या जोरावर मंजूर होण्याचा धोका आहे. तो लक्षात घेणे पर्यावरण रक्षणार्थ नितांत गरजेचे.

**रशिया-युक्रेन युद्धाला ५०० दिवस पूर्ण झाल्याच्या बातम्या झळकल्यात. एखादा सिनेमा किती दिवस चालला, तसे युद्धाचे दिवस मोजले जाताहेत. सांगायला हे युद्ध रशिया आणि युक्रेन यांच्यात होत असले तरी प्रत्यक्षात ही रशिया आणि अमेरिकेतील साठमारी आहे. महसात्तांच्या या युद्धात युक्रेनचा अफगाणिस्तान होत असून, दोन्हीकडचे लाखो लोक मेलेत. युद्धखोरीची ही खाज आणखी किती जणांना संपवणार?**

# महासत्तांच्या साठमारीत आणखी किती मारणार ?

दुसऱ्या महायुद्धानंतर सुरू झालेलं शीतयुद्ध संपल्याच्या कितीही गोष्टी झाल्या तरी, अमेरिका आणि रशिया यांच्यातील संघर्ष हा संपलेला नाही हे सर्वांना माहीत असलेले सत्य आहे. कारण हा संघर्ष जागतिक सत्ताकारणातील वर्चस्वाचा संघर्ष आहे तसाच तो शस्त्राच्या बाजारपेठेचा आणि बाजारावरील प्रभुत्वाचाही संघर्ष आहे.

जेव्हा आपण रशिया-युक्रेन युद्धाकडे या दृष्टिकोनातून पाहतो तेव्हा आपल्याला महासत्तांच्या साठमारीत अडकलेल्या सामान्य माणसाची दया येते. त्यातील अनेकांना राष्ट्रवादाचं आणि त्यासाठी झुंजायचं टॉनिक सतत दिलं जातं. तरीही आता सर्वसामान्यांनाही त्यातील निष्फळता कळली असून, अफगाणिस्तानातून सैन्य मागे घेण्यासाठी जो दबाव आला, तो त्यातूनच आला. आता युक्रेनचाही अफगाणिस्तान होतोय, हे हळूहळू कळू लागलं आहे. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी रशिया-युक्रेन युद्ध सुरू झालं. आतापर्यंत या युद्धात युक्रेनमधील



९ हजार नागरिकांचा मृत्यू झाला असून, त्यात ५०० लहान मुलं आहेत, असं संयुक्त राष्ट्रांनी म्हटलय. तसंच यात युक्रेनमधील १५ हजार सामान्य नागरिक जखमी झाले आहेत. युद्धामुळे जुलै २०२३ पर्यंत ६० लाख लोकांना आपली राहाती घरे सोडावी लागली. सर्वाधिक १२ लाख ७५ हजार ३१५ लोक रशियाला स्थलांतरित झाले.

कीव्ह स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या अहबालानुसार, युद्धाच्या ५०० दिवसांत युक्रेनच्या इमारती आणि पायाभूत सुविधांचे १९ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. युद्धहानीतून सावरण्यासाठी युक्रेनला पुढची १० वर्षे लागतील आणि ३३ लाख कोटी रुपये खर्च करावे लागतील, असे आंतराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) म्हटलंय.

अमेरिकन गुप्तचर संस्था सीआयएचे आकडे खरे मानले तर आतापर्यंत रशियाचे दोन लाखाहून अधिक सैनिक मृत्युमुखी पडले आहेत. तर त्यांच्याविरोधा लढणाऱ्या युक्रेन-अमेरिका आघाडीचे एक लाख ३१ हजार सैनिकांना मरण आलंय. या सगळ्या मानवी हानीची गोळाबेरीज केली तर, महासत्तांच्या या जीवघेण्या संघर्षात आतापर्यंत साडेतीन लाखाहून अधिक माणसं मारली गेलीत. जागतिक राजकारण हे जगाचा बाजार ताब्यात ठेवण्यासाठी खेळला जाणारा बुद्धिबळ आहे, असं अनेकदा लक्षात येतं. रशिया-युक्रेन युद्धही त्याचाच भाग आहे, हे आता काही गुपीत राहिलेलं नाही. आज जगातील एकूण शस्त्र निर्यातीमध्ये अमेरिकेचा वाटा ३९ टक्के आहे. तर रशियाचा हा वाटा १९ टक्के आहे. जगातील हे दोन शस्त्रनिर्यातदार युक्रेनच्या भूमीवर लढत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।
तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥
आणीक न लगे मायिक पदार्थ ।
तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# उद्धवजी, तुम्हाला 'कलंकीचा काविळ' झाला!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची उद्धव ठाकरेंवर खोचक टीका

| मुंबई | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**'देवेंद्र फडणवीस नागपूरचा कलंक' असे विधान उद्धव ठाकरे यांनी नागपूरातील सभेत केल्याने भाजपकडून त्याचा कडाडून विरोध केला जात आहे. तर देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरेंना प्रत्युत्तर देत तुम्हाला 'कंलकीचा काविळ' झाला असेल, एकदा उपचार करून घ्या., असा खोचक टोला लगावला. नोंद झाली आहे.**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर भाजयुमोर्च्या वतीने निषेध करण्यात आला आहे. कार्यकर्त्यांनी विमानतळावरील ठाकरेंच्या स्वागतासाठीचे होर्डिंग्ज फाडले, तर उद्धव ठाकरे यांच्या



विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. देवेंद्र फडणवीस म्हणजे नागपुरला कलंक आहे. यांचे "नाही,नाही नाही' म्हणजे हो, हो, हो' असते. राष्ट्रवादीशी युती करणार नाही असे त्रिवार सांगितल्या नंतरही राष्ट्रवादीच पक्षच पळवून भाजपात सामील केला. फडणवीसांची हालत सहनही होत नाही सांगताही येत नाही अशी झाली आहे, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

### फडणवीस काय म्हणाले

1) ज्यांच्यावर शेण खाल्ल्याचा आरोप केला, त्यांच्याचसोबत पंक्तीला बसून खाणे याला म्हणतात कलंक! 2) आमच्या हृदयस्थानी असलेल्या हिंदूहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांना जनाब संबोधन सहन करणे, याला म्हणतात कलंक! 3) सकाळ, दुपार, संध्याकाळ वीर सावरकरांचा अपमान करणाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसणे याला म्हणतात कलंक! 4) सकाळी वीर सावरकरांचा अपमान करणाऱ्यांच्या गळ्यात त्याचदिवशी रात्री गळे घालणे, याला म्हणतात कलंक! 5) ज्यांच्यावर राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी, त्यांनीच पोलिसांना चक्क वसुलीला लावणे, याला म्हणतात कलंक! 6) पोलिस दलातील स्वपक्षीय कार्यकर्त्याकडून उद्योगपतींच्या घरासमोर स्फोटके ठेवल्यावर त्याची पाठराखण करणे, तो लादेन आहे का असे विचारणे, याला म्हणतात कलंक! 7) कोरोनाच्या काळात मुंबईत लोक मरत असताना मृतदेहांच्या बॅगांमध्ये सुद्धा घोटाळा करणे, याला म्हणतात कलंक! 8) लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात न बसता लोकशाहीच्या पोकळ गप्पा मारणे, याला म्हणतात कलंक! असो, स्वत: कलंकित असले की इतरही कलंकित दिसायला लागतात. तुम्हाला 'कलंकीचा काविळ' झाला असेल तर एकदा उपचार करुन घ्या उद्धवजी!

भाजपमध्ये निष्ठावंतांचे काय हाल होत आहेत, हे तुम्हाला दिसत असेल. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तर हालत सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही, अशी झाली आहे. फडणवीस म्हणजे नागपूरला लागलेला कलंक आहे, फडणवीसांचे "नाही,नाही नाही' म्हणजे हो, हो, हो' असते. राष्ट्रवादीशी युती करणार नाही असे त्रिवार सांगितल्या नंतरही राष्ट्रवादीचा पक्षच पळवून भाजपात सामील केला, असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला.

### ठाकरे नामर्द मुख्यमंत्री : रवी राणा



माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे 2 दिवसीय विदर्भ दौऱ्यावर आहेत. सोमवारी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना भाजप हा राजकारणातील नामर्द पक्ष असल्याची तिखट टीका केली. त्यांच्या या टीकेला प्रत्युत्तर देताना आमदार रवी राणा यांनी ठाकरेंवर अश्लाघ्य शब्दांत टीका केली. राणा म्हणाले की, उद्धव ठाकरे नामर्द मुख्यमंत्री होते. ते आता 4 वर्षांनी अमरावतीत येत आहेत. कोरोना काळात जिल्ह्यात ऑक्सिजन मिळत नव्हता. बेडही मिळत नव्हते. शेतकरी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवत होते. त्यावेळी बाळासाहेब ठाकरेंच्या विचाराचे नेते व पदाधिकारी त्यांना फोन करत होते. पण त्यावेळी ठाकरे साधा फोनही उचलत नव्हते. रवी राणा पुढे बोलताना म्हणाले की, कोरोना काळात उद्धव ठाकरे माझे कुटुंब माझी जबाबदारी म्हणत मातोश्रीवर लपून बसले. अमरावतीच्या खासदारांना तब्बल 14 दिवस तुरुंगात डांबण्याचा नामर्दपणा त्यांनी केला. यावेळी त्यांनी विदर्भातील महिला त्यांना साडीचोळीचा आहेर देणार असल्याचा खोचक टोलाही लगावला.

# सरकारचा चौथा मंत्रिमंडळ विस्तार होणार!

## कोकणातून भरत गोगावले, डॉ. किणीकर, शिरसाट यांनाही स्थान?

| महाड |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्रात गेल्या आठवड्यात झालेल्या मोठ्या राजकीय भूकंपानंतर आता शिंदे फडणवीस सरकारचा चौथा मंत्रिमंडळ विस्तार होणार आहे. पावसाळी अधिवेशनापूर्वी हा मंत्रिमंडळ विस्तार केला जाईल. या मंत्रिमंडळ विस्ताराकडे कोकणातही लक्ष लागून राहिला आहे.**

कोकणातून उदय सामंत, दीपक केसरकर यांच्यानंतर केवळ आदिती तटकरे यांना संधी देण्यात आली आहे. मात्र या सरकारमध्ये सहभागी झालेले व मंत्रिपदाची इच्छा यापूर्वीच व्यक्त केलेले शिवसेनेचे महाडचे जेष्ठ आमदार भरत गोगावले यांचा अद्याप मंत्रिमंडळात समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे या मंत्रिमंडळ विस्तारात गोगावले यांचे नाव निश्चित करण्यात आल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. येत्या एक दोन दिवसात हा मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीच्या अजित दादांसह एकूण नऊ जणांना मंत्रिपदाची शपथ दिल्याने शिवसेनेच्या शिंदे यांच्या आमदारांमध्ये काहीशी अस्वस्थता होती रायगड मधील सहा आमदारांनी राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे यांना मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन थेट विरोध केला होता. रायगडचे पालकमंत्री पद आदिती तटकरे यांना देण्यात येऊ नये अशी उघडपणे मागणी त्यांनी केली होती. आता या सगळ्या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळाच्या विस्तारात भरत गोगावले यांचे नाव निश्चित झाले आहे. गोगावले यांना मंत्रिमंडळ स्थान मिळाल्यास



कोकणात उदय सामंत,आदिती तटकरे व दीपक केसरकर अशी एकूण चार मंत्रीपदे कोकणच्या वाट्याला येतील हे स्पष्ट आहे. ठाणे जिल्ह्यातून डॉ बालाजी किणीकर, मराठवाड्यातून संजय शिरसाट आणि कोकणातून भरत गोगावले यांचा समावेश होणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. शिवसेना भाजप युतीबरोबर उपमुख्यमंत्री अजित दादा यांची राष्ट्रवादी येणार असल्यानेच हा मंत्रिमंडळ विस्तार लांबला होता अशीही स्पष्ट कबुली गोगवले यांनीच चार दिवसांपूर्वी दिली होती इतकेच नव्हे तर हे घडणारच होते याची आम्हाला माहिती देण्यात आली होती असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं

दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात मंत्रिमंडळ विस्ताराबाबत गेल्या आठवड्यात चर्चा झाल्याची माहिती आहे. उपमुख्यमंत्री अजितदादांच्या राष्ट्रवादीला कोणते खाते द्यावे तसेच कोणत्या अकार्यक्षम मंत्र्यांना वगळले जावे या विषयावर प्राथमिक चर्चा झाल्याची माहिती मिळत आहे. गेल्या आठवड्यातच मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांच्यात जवळपास तासभर चर्चा झाल्याच वृत्त आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला कोणते खाते देण्यात यावे, मंत्रिमंडळ विस्तारात कुठल्या अकार्यक्षम मंत्र्यांना वगळण्यात यावे याबाबत चर्चा झाल्याचे समजते.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे अर्थ खाते देण्यास शिवसेना व भाजप या दोघांचाही विरोध आहे. त्यामुळे त्यांच्याकडे विखे पाटलांचे महसूल खाते देण्यात येईल अशी सूत्रांची माहिती आहे. शिंदे गटाचे अकार्यक्षम म्हणून शिक्का असलेले मंत्री अब्दुल सत्तार, डॉ तानाजी सावंत आणि संदीपान भुमरे यांना मंत्रिमंडळातून वगळण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या जागी अंबरनाथचे आमदार डॉ बालाजी किणीकर, औरंगाबाद पश्चिम विधानसभेचे आमदार संजय शिरसाट आणि महाडचे आमदार भरत गोगावले यांचा समावेश शिंदे गटाकडून केला जाणार असल्याचे समजते.

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री धुळे दौऱ्यावर

दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे धुळे दौऱ्यावर असल्याने मंत्रिमंडळ विस्तारा बाबत चर्चा होऊ शकली नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दुसरे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार या तिघांमध्येही चर्चा झाल्यानंतरच मंत्रिमंडळ विस्तारावर शिक्कामोर्तब केल जाईल.

# फ्रान्स संरक्षण करार शक्य!

## नौदलासाठी 26 राफेल, 3 पाणबुड्या खरेदी करणार; 45 हजार कोटींचा करार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी 13-14 जुलै रोजी फ्रान्सच्या दौऱ्यावर जाणार आहेत. फ्रान्सच्या राष्ट्रीय परेडमध्ये ते सन्माननीय अतिथी असतील. यादरम्यान 26 राफेल लढाऊ विमाने आणि 3 पाणबुड्या खरेदी करण्याचा करार होऊ शकतो. हा करार 5.5 अब्ज डॉलर (45 हजार कोटी रुपये) चा आहे. राफेलची 'एम' आवृत्ती फ्रेंच विमान कंपनी डसॉल्ट एव्हिएशनकडून खरेदी केली जाणार आहे. ही तीच कंपनी आहे जिथून हवाई दलाने 36 राफेल खरेदी केली आहेत.**

भारतीय किनारपट्टीची सुरक्षा अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीनेही हा दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. केंद्र सरकारने नौदलासाठी लढाऊ विमाने खरेदी करण्याची तयारी पूर्ण केली आहे. राफेल एम लढाऊ विमाने खास सागरी क्षेत्रात हवाई हल्ल्यांसाठी तयार करण्यात आली आहेत. ते प्रथम स्वदेशी विमानवाहू जहाज INS विक्रांतवर तैनात केले जातील.

सध्या आयएनएस विक्रांतवर रशियन मिग-29 तैनात आहेत, ज्यांना हळूहळू सेवेतून बाहेर काढले जात आहे. पंतप्रधानांच्या फ्रान्स दौऱ्याच्या आधी संरक्षण अधिग्रहण परिषद या कराराला औपचारिक मान्यता देण्यासाठी बैठक घेणार आहे. सूत्रांनी सांगितले की राफेल एम वर तज्ञांचे एकमत झाले आहे. भारत सरकार गेल्या 4 वर्षांपासून आयएनएस विक्रांतसाठी नवीन लढाऊ विमाने खरेदी करण्याच्या योजनेवर काम करत होते. दोन वर्षांपूर्वी, अमेरिकन बोईंग एफए-18 सुपर हॉर्नेट आणि फ्रेंच राफेल एम यांच्यात निवड करण्याच्या प्रक्रियेवर काम सुरू झाले.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी 13-14 जुलै रोजी फ्रान्सच्या दौऱ्यावर



नौदलाने गेल्या वर्षी गोव्यात सुपर हॉर्नेट आणि राफेल एमची चाचणी घेतली होती. दोन्ही लढाऊ विमानांच्या गुण-दोषांबाबत संक्षिप्त अहवाल तयार करण्यात आला. भारतीय संरक्षण तज्ञांना आयएनएस विक्रांतच्या गरजेसाठी राफाल एम योग्य वाटले, तर बोईंग एफए-18 बद्दल भारतीय तज्ञ सहमत नव्हते. त्यामुळे रफाल एमचे आगमन निश्चित मानले जात आहे. आयएनएस विक्रांतच्या सागरी चाचण्याही सुरू झाल्या आहेत. त्याच्या डेकवरील फायटर ऑपरेशन्सची अजून चाचणी व्हायची आहे.

करारावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर तांत्रिक आणि खर्चाची औपचारिकता पूर्ण होण्यासाठी किमान एक वर्ष लागेल. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की राफेल नौदलासाठी देखील योग्य आहे कारण हवाई दलाने राफेलच्या देखभालीशी संबंधित पायाभूत सुविधा तयार केल्या आहेत.

नौदलासाठीही हे काम करेल. यामुळे खूप पैसे वाचतील. सूत्रांचे म्हणणे आहे की राफेल एमच्या पहिल्या तुकडीला येण्यासाठी 3 वर्षे लागू शकतात. हवाई दलासाठी 36 राफेलचा सौदा 2016 मध्ये झाला होता आणि डिलिव्हरी पूर्ण करण्यासाठी 7 वर्षे लागली. राफेलची 'एम' आवृत्ती भारतात सध्या असलेल्या राफेल लढाऊ विमानांमधून प्रगत आहे. INS विक्रांत वरून उड्डाण करण्यासाठी स्की जंपिंग हे अधिक शक्तिशाली इंजिन असलेले लढाऊ विमान आहे.

याला 'शॉर्ट टेक ऑफ बट अरेस्टर लँडिंग' म्हणतात. अगदी कमी जागेतही उतरता येते. ते 15.27 मी. उंच, 10.80 मी. रुंद, 5.34 मी. उच्च आहे त्याचे वजन 10,600 किलो आहे.

त्याचा वेग 1,912 किमी प्रति तास आहे. त्याची रेंज 3700 किमी आहे. ते 50 हजार फूट उंचीपर्यंत उडते. अँटीशिप स्ट्राइकसाठी हे सर्वोत्तम मानले जाते. अणु प्रकल्पावरील हल्ल्याच्या दृष्टिकोनातूनही त्याची रचना करण्यात आली आहे.

# उत्तर कोरियाने दिली अमेरिकेची विमाने पाडण्याची धमकी

## अमेरिका उत्तर कोरियाजवळ आण्विक पाणबुड्या तैनात करणार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**उत्तर कोरियाने सोमवारी अमेरिकेची विमाने पाडण्याची धमकी दिली आहे. संरक्षण मंत्रालयाच्या प्रवक्त्याने अमेरिकेवर उत्तर कोरियाच्या हवाई हद्दीत घुसखोरी करून त्यावर नजर ठेवल्याचा आरोप केला आहे. अमेरिकन हेर विमाने आणि ड्रोनच्या वापराचाही उल्लेख करण्यात आला**

तेथील अधिकृत वृत्तसंस्था KCNA ला दिलेल्या निवेदनात उत्तर कोरियाच्या प्रवक्त्याने सांगितले की, जर अमेरिकन विमान त्यांच्या हवाई क्षेत्रात पुन्हा दिसले तर त्यांच्यावर हल्ला करून त्यांना खाली पाडले जाईल. अमेरिकेने प्रक्षोभक कारवाया करून या भागाला आण्विक युद्धाकडे ढकलल्याचा आरोपही उत्तर कोरियाने केला आहे. आपल्या वक्तव्यात उत्तर कोरियाने अमेरिकेच्या योजनेवरही जोरदार टीका केली आहे ज्याअंतर्गत कोरियन द्वीपकल्पात आण्विक पाणबुड्या तैनात केल्या जातील. असे करून अमेरिका त्यांच्या देशाला ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करत असल्याचे उत्तर कोरियाने म्हटले आहे. वास्तविक, एप्रिलमध्ये अमेरिकेने दक्षिण कोरियाला भेट देण्यासाठी आण्विक क्रूझ मिसाइल पाणबुडी पाठवण्यात येणार असल्याचे सांगितले होते.

मात्र, अमेरिकेने त्याची वेळ सांगितली नाही. 1981 पासून एकही अमेरिकन पाणबुडी कोरियाला पाठवण्यात आलेली नाही.

त्याचवेळी उत्तर कोरियाने अमेरिकेला दिलेल्या धमकीबद्दल विचारले असता त्यांनी काहीही बोलण्यास नकार दिला. तर दक्षिण कोरियाने उत्तर कोरियाच्या हवाई

### कोरियाने केल्या 90 क्षेपणास्त्र चाचण्या

**तर दक्षिण कोरियाने उत्तर कोरियाच्या हवाई हद्दीत अमेरिकेच्या कोणत्याही विमानाने घुसखोरी केली नसल्याचे म्हटले आहे.. तर दक्षिण कोरियाने उत्तर कोरियाच्या हवाई हद्दीत अमेरिकेच्या कोणत्याही विमानाने घुसखोरी केली नसल्याचे म्हटले आहे. त्याचवेळी गेल्या 18 महिन्यांत निर्बंध असतानाही उत्तर कोरियाने एकापाठोपाठ 90 क्षेपणास्त्र चाचण्या केल्या आहेत.**

हद्दीत अमेरिकेच्या कोणत्याही विमानाने घुसखोरी केली नसल्याचे म्हटले आहे. त्याचवेळी गेल्या 18 महिन्यांत निर्बंध असतानाही उत्तर कोरियाने एकापाठोपाठ 90 क्षेपणास्त्र चाचण्या केल्या आहेत.

मे महिन्यात गुप्तचर उपग्रह सोडण्याचाही प्रयत्न झाला होता. नाटोच्या बैठकीत हा मुद्दा उपस्थित करणार असल्याचे दक्षिण कोरियाने म्हटले आहे. उत्तर कोरियाशी सामना करण्यासाठी नाटो देशांची मदत घेणार असल्याचे दक्षिण कोरियाचे अध्यक्ष यून सुक येओल यांनी म्हटले आहे. उत्तर कोरियाने या वर्षी पहिल्या घन इंधन आंतरखंडीय क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणीदेखील केली आहे. त्याच्या चाचणीदरम्यान, लोकांना जपानच्या उत्तरेकडील प्रदेशातून बाहेर काढले जात होते.

त्याच वेळी, जपानमधील होक्काइडोमध्ये शाळा उशिरा सुरू झाल्या, काही गाड्यांच्या वेळाही बदलण्यात आल्या. या क्षेपणास्त्र चाचणीवेळी उत्तर कोरियाचा हुकूमशहा किम जोंग उन आपल्या मुलीसह पत्नीसह उपस्थित होता.

# शाहरुख प्रथमच बाल्ड लूकमध्ये



शाहरुख खानच्या बहुप्रतिक्षित 'जवान' चित्रपटाचा प्रिव्ह्यू रिलीज झाला आहे. या प्रिव्ह्यूमध्ये शाहरुख पहिल्यांदाच बाल्ड म्हणजेच टक्कल पडलेल्या लूकमध्ये दिसत आहे. या चित्रपटात तो दुहेरी भूमिकेत दिसणार आहे. जिथे एक आयपीएस अधिकारी आहे, तर दुसरी भूमिका खलनायकाची आहे. हा प्रिव्ह्यू एका तासात 28 लाख युजर्सनी पाहिला. शाहरुख, विजय सेतुपती, नयनतारा आणि सान्या मल्होत्रा स्टारर हा चित्रपट 7 सप्टेंबरला रिलीज होणार आहे. याची सुरुवात एका आदिवासी कुळापासून होते जिथे रक्तपात झाला आहे. यानंतर शाहरुखचा व्हॉईस ओव्हर ऐकू येतो ज्यामध्ये तो त्याची कहाणी सांगत आहे. प्रिव्ह्यूमध्ये तो कुठे आयपीएसच्या भूमिकेत तर कुठे खलनायकाच्या भूमिकेत दिसत आहे. इतर कलाकारांबद्दल बोलायचे झाले तर नयनताराही पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसत आहे. तर दीपिका पदुकोण एका सीनमध्ये शाहरुखसोबत कुस्ती करताना दिसली होती. विजय सेतुपतीही एका दृश्यात दिसला. त्याचे चारित्र्य गुप्त ठेवण्यात आले आहे. सान्या मल्होत्रा, प्रियामणी, रिद्धी डोगरा, संजीता भट्टाचार्य देखील या प्रिव्ह्यूमध्ये दिसत आहेत. हे सर्वजण ॲक्शन अवतारात शाहरुखच्या गँगचा भाग म्हणून दिसत आहेत. प्रिव्ह्यूच्या शेवटी, जेव्हा शाहरुख चेहऱ्यावरील पट्टी काढतो तेव्हा तो टक्कल झालेल्या लूकमध्ये दिसतो. तो म्हणतो की, मी खलनायक झालो की माझ्यासमोर एकही नायक टिकू शकत नाही. या सीनमध्ये त्याने ट्रेन हायजॅक केली आहे. या प्रिव्ह्यूला सोशल मीडियावर जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे.

# लंडनच्या रस्त्यांवर अनुष्काची मस्ती

अनुष्का शर्मा नुकतीच पती-क्रिकेटर विराट कोहली आणि मुलगी वामिकासोबत लंडनमध्ये सुट्टी एन्जॉय करताना दिसली. अभिनेत्रीने रविवारी तिच्या व्हॅकेशन दरम्यान इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला, ज्यामध्ये ती लंडनच्या रस्त्यावर मस्ती करताना दिसत आहे. या व्हिडिओमध्ये अनुष्का विराटसोबत मस्ती करताना तर कधी फोटो काढताना दिसत आहे. अभिनेत्री लंडनच्या रस्त्यांवर कॉफीचा कप घेऊन फिरताना दिसत आहे. मेट्रोनेही प्रवास



केला. लुकबद्दल बोलायचे झाले तर, अनुष्काने सर्व डेनिम लूक कॅरी केला आहे. तर विराट काळ्या रंगाच्या डेनिम जॅकेट आणि पांढऱ्या पँटमध्ये दिसला. तो वामिकाला स्ट्रोलरमध्ये घेऊन जाताना देखील दिसला. अनुष्का शर्मा 2018 पासून मोठ्या पडद्यापासून दूर आहे. आता ती लवकरच प्रोसित रॉय दिग्दर्शित चकदा एक्सप्रेस या बायोपिक चित्रपटात दिसणार आहे. हा चित्रपट भारताची माजी क्रिकेटपटू झुलन गोस्वामी हिच्या जीवनावर आधारित आहे. अभिनेत्री शेवटची 2018 मध्ये शाहरुख खान आणि कतरिना कैफसोबत 'झिरो' चित्रपटात दिसली होती.

# शकीराच्या वाका-वाकाने केले रिलीस




लवकरच तमन्ना भाटिया सुपरस्टार रजनीकांतसोबत जेलर या चित्रपटात दिसणार आहे. चित्रपटात तमन्ना रजनीकांतसोबत कावाला या गाण्यावर डान्स करताना दिसणार आहे. गेल्याच दिवशी तमन्नाने चित्रपटातील कावाला या गाण्यावर डान्स करतानाचा व्हिडिओही सोशल मीडियावर शेअर केला होता. सोशल मीडियावरील युजर्सनी तमन्नाच्या या डान्स व्हिडिओचे खूप कौतुक केले आणि त्याला मूळ गाण्याच्या व्हिडिओपेक्षा चांगले म्हटले. आता तमन्नाच्या चाहत्यांनी तिच्या डान्स व्हिडिओमध्ये शकीराच्या वाका-वाका गाण्याने कावला गाण्याऐवजी संपादित व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. चाहत्यांनी तमन्नाची तुलना शकीराशी केली.ारतीय शकीरा कुठे आहे? या व्हिडिओवर तमन्नानेही ट्विटरवर प्रतिक्रिया दिली आहे. तमन्नाने ट्विट करताना लिहिले आहे – हे गाणे उत्तम प्रकारे सिंक होत आहे हे मला मान्य करावे लागेल. सोशल मीडिया यूजर्सनाही हा एडिटेड व्हिडीओ खूप आवडला. एका यूजरने व्हिडिओवर लिहिले - भारतीय शकीरा हे तमन्नासाठी खूप चांगले नाव आहे. त्याचवेळी एका यूजरने लिहिले - खरं तर हे बघून असे दिसते की तमन्ना शकीराच्या गाण्यावर डान्स करत आहे - दिस टाइम फॉर आफ्रिका. तू आमची भारतीय शकीरा आहेस. जेलर चित्रपटाचा ट्रेलर 6 जुलै रोजी प्रदर्शित झाला. चित्रपटात तमन्ना भाटिया सुपरस्टार रजनीकांतसोबत कवला या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. रजनीकांत आणि तमन्ना एकत्र गाण्याची हुक स्टेप करत आहेत. हे गाणे शिल्पा राव आणि अनिरुद्ध रविचंदर यांनी गायले आहे. अनुराज कामराज यांनी या गाण्याचे बोल लिहिले आहेत. हा चित्रपट यावर्षी 10 ऑगस्टला रिलीज होणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शक नेल्सन दिलीप कुमार आहेत. चित्रपटात रजनीकांत एका जेलरच्या भूमिकेत आहे जो एका मिशनवर आहे. या चित्रपटात कन्नड सुपरस्टार शिवा राजकुमार, रामय्या कृष्णन, योगी बाबू, वसंत रवी आणि विनायकन दिसणार आहेत. मल्याळम सुपरस्टार मोहनलाल देखील या चित्रपटात खास भूमिका साकारणार आहेत. यासोबतच बॉलिवूड अभिनेता जॅकी श्रॉफही या चित्रपटात दिसणार आहे.

# सलमानच्या हातात सिगारेट

सलमान खान सध्या बिग बॉस ओटीटी 2 होस्ट करत आहे. अलीकडेच शोच्या सेटवरून त्याचा एक फोटो समोर आला आहे जो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.या फोटोमध्ये सलमान हातात सिगारेट घेऊन दिसत आहे. हा फोटो व्हायरल होताच लोकांनी सलमानला ट्रोल करायला सुरुवात केली. सलमानने गेल्या शनिवारी वीकेंड का वार हा एपिसोड होस्ट केला होता. यावेळी त्याने नियम तोडल्याबद्दल स्पर्धकांना खडसावले. मात्र, दरम्यान, सेटवरून समोर आलेल्या एका फोटोवरून सलमानलाच ट्रोल केले जात आहे. फोटोमध्ये, शो होस्ट करताना सलमानच्या हातात सिगारेट दिसत आहे. हे छायाचित्र समोर आल्यानंतर सोशल मीडिया यूजर्सनी सलमानला ढोंगी म्हटले आहे. एकीकडे सलमान शोमधील स्पर्धकांना शिष्टाचार शिकवत असताना दुसरीकडे तो स्वत: कॅमेऱ्यासमोर असे कृत्य करत असल्याचे युजर्स म्हणाले. एका यूजरने लिहिले की, 'एक आठवड्यापूर्वी सलमानने शोमध्ये स्पर्धकांना समजावून सांगितले होते की तो संस्कृतीच्या विरोधात ऑनस्क्रीन किस करत आहे.' त्याचवेळी दुसऱ्या युजरने लिहिले की, 'जेव्हा तुम्ही इतरांना लेक्चर देत असाल, तेव्हा किमान त्यांच्यासमोर चांगले वागा.' अलीकडेच सलमानने शोमधील स्पर्धकांना फटकारले आणि म्हटले की त्यांनी भांडण केले तरी त्यांनी त्यांच्या मर्यादेत राहावे. घरातील हिंसाचार अजिबात खपवून घेणार नाही, असे तो म्हणाला होता.

# अक्षय कुमार महादेवांच्या इंटेन्स लूकमध्ये

लवकरच अक्षय कुमार, पंकज त्रिपाठी आणि यामी गौतम OMG 2 या चित्रपटात दिसणार आहेत. अक्षय कुमार, यामी गौतम आणि चित्रपटाच्या टीमने सोशल मीडियावर चित्रपटाच्या टीझरच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. चित्रपटातील आपला लूक शेअर करताना अक्षय कुमारने सोशल मीडियावर सांगितले की, OMG 2 चा टीझर 11 जुलै रोजी येणार आहे. अक्षय कुमारने या चित्रपटातील त्याच्या लूकची एक व्हिडिओ क्लिप सोशल मीडियावर शेअर केली आहे. या व्हिडिओमध्ये अक्षय भगवान शिवाच्या लूकमध्ये दिसत आहे. खुल्या केसांसह अक्षय काळ्या रंगाच्या आउटफिटमध्ये दिसत आहे. चित्रपटातील त्याचा लूक खूपच इंटेन्स दिसत आहे. व्हिडिओमध्ये अक्षय या लूकमध्ये लोकांच्या गर्दीतून जात आहे. व्हिडिओच्या पार्श्वभूमीवर हर हर महादेवची धून वाजत आहे. व्हिडिओ शेअर करताना अक्षय कुमारने लिहिले- OMG 2 टीझर 11 जुलैला येईल! OMG 2 11 ऑगस्ट रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. अक्षयच्या लूकचे सोशल मीडियावर खूप कौतुक होत आहे. एका यूजरने लिहिले आहे - हर हर महादेव! मी OMG 2 ची आतुरतेने वाट पाहत आहे. OMG 2 हा अक्षय कुमार आणि परेश रावल अभिनीत सुपरहिट चित्रपट OMG चा सिक्वल आहे. पिंकविलाच्या रिपोर्टनुसार, 12 जुलैपासून टॉम क्रूझच्या मिशन इम्पॉसिबल 7 च्या टीझरसह OMG 2 चा टीझर रिलीज होऊ शकतो. अमित राय हे OMG 2 चे लेखक-दिग्दर्शक आहेत.



# रोहित शर्माने अपेक्षाभंग केला!

## गावस्करांची कर्णधार रोहित श्रमावर टीका

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**टीम इंडियाचा सध्याचा कर्णधार रोहित शर्माच्या कर्णधारपदावर दिग्गज फलंदाज सुनील गावसकर खूश नाहीत. गावसकर एका मुलाखतीत म्हणाले - मला रोहित शर्माकडून खूप आशा होत्या, पण तो कर्णधार म्हणून खरा ठरला नाही. रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने एकही आयसीसी ट्रॉफी जिंकलेली नाही. प्रथम भारतीय संघ T20 विश्वचषक हरला आणि त्यानंतर WTC फायनलमध्येही संघाला पराभवाचा सामना करावा लागला.**

भारताचा माजी गोलंदाज हरभजन सिंग म्हणाला की, रोहितवर अशाप्रकारे टीका करणे योग्य नाही. तो चांगला लीडर आहे. आयपीएलमध्ये यश मिळवूनही रोहितने निराशा केली गावस्कर पुढे म्हणाले - मला रोहितकडून खूप आशा होत्या. भारतात



कोणीही चांगली कामगिरी करू शकतो, पण परदेशात चांगली कामगिरी करणे ही कसोटी असते आणि येथे त्याची कामगिरी थोडी निराशाजनक झाली आहे. रोहितने आयपीएलमध्ये 5 वेळा मुंबई इंडियन्सला आयपीएल ट्रॉफी जिंकून दिली, पण तरीही टी-20 मध्ये भारताची कामगिरी चांगली झाली नाही. गावस्कर पुढे म्हणाले की, डब्ल्यूटीसी फायनल हरल्यानंतर कर्णधार रोहित शर्मा आणि प्रशिक्षक राहुल द्रविडवर प्रश्न उपस्थित केले पाहिजेत. भारताने प्रथम क्षेत्ररक्षण का निवडले? मग प्रश्न असा असावा की, 'तुम्हाला ट्रॅव्हिस हेडच्या शॉर्ट बॉलच्या कमकुवतपणाबद्दल माहिती नव्हती?' त्याने 80 धावा केल्या तेव्हा बाउन्सर का टाकला नाही? हेड बॅटिंगला येताच रिकी पॉंटिंग कॉमेंट्री बॉक्समध्ये म्हणत होता, 'हेडला बाहेर काढायचे असेल तर बाउन्सर टाका? प्रत्येकाला याबद्दल माहिती होती, परंतु आम्ही प्रयत्न केला नाही.



### हरभजनने गावस्कर यांना चुकीचे ठरवले

गावस्कर यांच्या कमेंटवर भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंग म्हणाला- मला वाटते की लोक रोहितवर टीका करण्यासाठी मर्यादा ओलांडत आहेत. क्रिकेट हा सांघिक खेळ आहे आणि एक खेळाडू संपूर्ण सामना जिंकू शकत नाही. हरभजन पुढे म्हणाला- मला माहित आहे की टीम इंडियाने डब्ल्यूटीसी फायनलमध्ये चांगली कामगिरी केली नाही, परंतु आम्हाला यातून पुढे जायचे आहे. एकट्या रोहितवर टीका करणे योग्य नाही. प्रत्येकजण म्हणत आहे की रोहित धावा करत नाही, वजन वाढवत आहे आणि कर्णधारही चांगले नाही, परंतु मला वाटते की तो एक महान नेता आहे.

# वर्ल्ड चॅम्पियन मेस्सीचं गिफ्ट!

## टीममेट्सला देणार गोल्ड कस्टमाईज आयफोन

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**फिफा वर्ल्ड कप २०२२ चा चॅम्पियन संघ अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सी सध्या एका खास कारणामुळे चर्चेत आला आहे. मेस्सीने जे काम केले आहे, ते खरं पाहता तोच शकतो. लिओनेल मेस्सीने त्याच्या संघातील सहकाऱ्यांसह सपोर्ट स्टाफला गोल्ड प्लेटेड कस्टमाइज्ड आयफोन भेट देण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व IPHONES वर संघातील खेळाडूंची नावे आणि जर्सी क्रमांक असतील. लिओनेल मेस्सीला विश्वविजेतेपदाचा मुकुट मिळाल्याने खूप आनंद झाला आहे आणि त्याने या प्रसंगी आपल्या सहकाऱ्यांना सोन्याचे आयफोन भेट देण्याचा निर्णय घेतला आहे.**

जवळजवळ १० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर लिओनेल मेस्सीने अर्जेंटिनाला विश्वचषक जिंकून देण्यात यश मिळवले. मेस्सीने विश्वचषकापूर्वी निवृत्ती जाहीर केली होती पण चॅम्पियन बनल्यानंतर त्याने आपला निर्णय बदलला. अशा परिस्थितीत आता मेस्सी आपल्या सहकाऱ्यांसोबत विश्वचषक जिंकण्याचा आनंद साजरा करणार आहे. मेस्सी जे सोन्याचे आयफोन भेट देणार आहे, त्यांची किंमत प्रत्येकी १७५,००० युरो इतकी आहे. म्हणजेच भारतीय चलनानुसार त्याची किंमत सुमारे १.७३ कोटी रुपये आहे. मेस्सीला विश्वचषक विजेत्या संघातील सदस्यांसाठी काहीतरी खास करायचे होते, असे सांगितले जात आहे. त्यामुळे घड्याळपेक्षा साध्या भेटवस्तूऐवजी काहीतरी वेगळं मेस्सीला करायचं होतं. यासाठी त्याने उद्योजक बेन लियॉन यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांनीच गोल्ड प्लेटेड कस्टमाइज्ड आयफोन देण्याची कल्पना सुचवली.

बिझनेसमन बेन लियॉन म्हणाले- मेस्सी मला वर्ल्ड कपनंतर भेटला होता. त्याला हा अविस्मरणीय विजय खास बनवायचा होता आणि त्याला त्याच्या सहकारी खेळाडूंना तसेच सपोर्ट स्टाफच्या सदस्यांना विशेष भेटवस्तू द्यायची होती. मेस्सीला एखादे साधे गिफ्ट किंवा घड्याळेसारखे काहीतरी नको होते, म्हणून मी त्याला त्याच्या नावाचा गोल्ड आयफोन भेट म्हणून सुचवला. मेस्सीला ही कल्पना खूप आवडल्याचेही त्यांनी पुढे सांगितले. फिफा विश्वचषक २०२२ च्या अंतिम फेरीत अर्जेंटिनाचा सामना फ्रान्सशी झाला. हा सामना दोन्ही संघांमध्ये चांगलाच रंगला आणि निर्धारित वेळेत स्कोअर ३-३ असा बरोबरीत होता. यानंतर पेनल्टी शूटआऊटमध्ये अर्जेंटिनाने फ्रान्सचा ४-२ असा पराभव केला. यासह, २० वर्षांनंतर, मेस्सीच्या नेतृत्वाखाली युरोप बाहेरील संघ फिफा वर्ल्ड चॅम्पियन बनला.




# सात्विक अन् चिरागने इतिहास रचला!



। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारताचे बॅडमिंटनपटू सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी इंडोनेशिया ओपनचे विजेतेपद पटकावून इतिहास रचला आहे. पुरुष दुहेरीत सात्विक आणि चिरागने अंतिम सामन्यात मलेशियाच्या आरोन चिया आणि सोह वुई यिकला आस्मान दाखवलं आहे. मलेशियाच्या जोडीचा २१-१७, २१-१८ अशा स्ट्रेट सेटमध्ये पराभव केला. सात्विक आणि चिराग या जोडीचं हे पहिलं सुपर १००० वर्ल्ड टूर विजेतेपद आहे. मलेशियाच्या जोडीविरुद्ध ७ वेळा पराभव झाल्यानंतर सात्विक आणि चिराग यांना पहिल्यांदा विजय मिळवता आला. इंडोनेशिया ओपनच्या डबल्स इव्हेंटमध्ये भारताचं हे पहिलं विजेतेपद आहे. आरोन चिया आणि सोह वुई यिक यांची जोडी पुरुष डबल्समध्ये वर्ल्ड चॅम्पियन आहे. भारताच्या सात्विक आणि चिराग यांनी पहिला गेम जिंकला होता. मलेशियाच्या जोडीने सामन्यात सुरुवात आक्रमक केली होती. त्यांच्याकडे आघाडी होती पण पुन्हा मुसंडी मारत भारताच्या जोडीने पुनरागमन केलं.